नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०३/२०२५ (शनिवार ) सकाळ**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्याता आले आहे.

पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत एम आय डी सी बोरी पोलीस रात्री पेट्रोलीग करीत असतांना त्यांनी आरोपी **नामे विजय पांडुरंग पटल, वय ४४ वर्षे, रा सुकळी बेलदार, ता हिगणा, जि. नागपुर आणि प्रफुल आबाजी संतोषवार, वय ३४ वर्षे ,रा सुकळी बेलदार ,हिगणा जि नागपुर** हे मौजा गंगापुर झोपडपटटी जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपीतांवर कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत बोरी पोलीस रात्री पेट्रोलीग करीत असतांना त्यांनी आरोपी नामे **प्रणव विलासराव फांदाडे, वय ३५ वर्षेर, रा. तुकडोजी पुतळा, ता.जि. नागपुर ह. मु. पुरुषोत्तम जाधव यांचे घरी किरायाणे दुर्गा मंदीर जवळ, बुटीबोरी ता.जि. नागपुर हा मौजा बुटीबोरी** येथील पुण्यनगरी प्रेस रोड वर सार्वजनिक ठिकाणी आणि **जिशान सबिर शेख, वय १९ वर्षे ,रा. मुलताई, ता. जि. बैतुल राज्य मध्यप्रदेश ह.मु. म्हाडा कॉलोनी, क्वार्टर नं. ७५ बुटीबोरी ता. जि. नागपुर** हा मौजा नविन बस स्टॅड बुटीबोरी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपीतांवर कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन बेला अंतर्गत बेला पोलीस रात्री पेट्रोलीग करीत असतांना त्यांनी आरोपी शंकर सुनिल काळे वय २७ वर्ष रा. समुद्रपुर ता. समुद्रपुर जि. वर्धा हा मौजा मौजा सिर्सी शिवार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने आरोपीवर कलम

२७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

## जागतिक महीला दिना निमित्य पोलीस स्टेशन सावनेर येथे घेण्यात आला महीला मेळावा

पोलीस स्टेशन सावनेर येथे आज दिनांक ०८/०३/२०२५ रोजी जागतिक महीला दिनानिमित्य महीला मेळावा घेण्यात आला. सदर महीला मेळाव्या मध्ये महीला सुरक्षा,महीला विषयीचे कायदे, सायबर गुन्हे, विविध क्षेत्रांतील महीलांचे योगदान या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

सदर महीला मेळाव्यास श्री अनिल मस्के, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर,विभाग, सावनेर ,मा. श्रीमती एस.एम गाडे, न्यायधीश, सावनेर, श्रीमती किरण बगडे, मुख्याधिकारी सावनेर, ॲडव्होकेड श्रीमती माधुरी चौधरी,श्रीमती उषा पवार, श्रीमती कल्याणी वतेकर, पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील,प्रभारी अधिकारी, सावनेर पोलीस स्टेशन, सहा पोलीस निरीक्षक प्राची राजुरकर, पोलीस स्टेशन सायबर आणि सहा.पोलीस निरीक्षक मंगला मोकाशी, पोलीस स्टेशन सावनेर यांनी मार्गदर्शन केले.

सदर महीला मेळाव्यात अंगणवाडी सेविका,मदतनीस, बचत गट अध्यक्षा, महीला पोलीस पाटील, ग्रामीण रूग्णालय येथील महीला कर्मचारी, इतर शासकीय कार्यालयातील महीला कर्मचारी ,महीला पोलीस अंमलदार आणि महीला सैनिक होमगार्ड हजर होत्या.


पोलीस स्टेशन सावनेर
नागपूर जिल्हा ग्रामीण
महाराष्ट्र पोलीस
द्वारा आयोजित
जागतिक महिला दिनानिमित्त
महिला मेळावा कार्यक्रम
दिनांक : 08/03/2025, सकाळी 11. वा. स्थळ : पोलीस स्टेशन सावनेर



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर